**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातील सर्व २९ महापालिकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर; १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला होणार मतमोजणी.**
2. **राज कुमार गोयल यांनी आज देशाचे मुख्य माहिती आयुक्त म्हणून घेतली शपथ.**
3. **देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७५व्या पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली.**
4. **राज्यशासनाच्या बहुतेक विभागांमधे अनुदाने वेळेवर खर्च होत नसल्याचं कॅगचं निरीक्षण.**

**आता सविस्तर बातम्या** .......

राज्य निवडणूक आयोग

राज्यातील सर्व २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारीला मजमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज केली. यासाठी २३ डिसेंबर पासून ३० डिसेंबर पर्यंत अर्ज भरता येतील. अर्जांची छाननी ३१ डिसेंबरला होईल आणि २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला अंतिम उमेदवारांची घोषणा होईल आणि चिन्ह वाटप होईल. या निवडणुकीत एकूण २ हजार ८६९ जागांसाठी निवडणूक होईल. मुंबईत एक सदस्यीय प्रभाग रचना आहे आणि इतर ठिकाणी ४ सदस्यीय प्रभाग आहेत. काही प्रभागात ३ आणि ५ सदस्य आहेत. मतदारांना जितके प्रभाग सदस्य तितकी मत द्यावी लागतील. हे मतदान EVM वर होणार आहे. ३ कोटी ४८ लाखांहून अधिक मतदार या निवडणुकीत मतदान करतील, असं राज्य निवडणुक आयुक्त वाघमारे यांनी सांगितलं.

दरम्यान, आजपासून २९ महापालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे.

## मुख्य माहिती आयुक्त

राज कुमार गोयल यांनी आज मुख्य माहिती आयुक्त म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात गोयल यांना गापनियतेची शपथ दिली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ३ जणांच्या समितीने गोयल यांच्या नावाची शिफारस गेल्या आठवड्यात या पदासाठी केली. राजकुमार गोयल हे भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी असून, केंद्र सरकारच्या न्याय विभागाचे सचिव म्हणून गेल्या ऑगस्टमधे सेवानिवृत्त झाले. या समितीने इतर ८ आयुक्तांची नावंही सुचवली असून, तब्बल ९ वर्षांनंतर माहिती आयोगात सर्व आयुक्तांची पदं भरली आहेत.

## आक्षेपार्ह वक्तव्य

दिल्लीत काँग्रेसच्या रॅलीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल काँग्रेसनं माफी मागावी, अशी मागणी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सदस्यांनी आज संसदेच्या दोन्ही सभागृहात केली. यावरुन झालेल्या गदारोळामुळे लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज आज बाधित झालं. तत्पूर्वी,सभागृहानं माजी सदस्य सुभाष अहुजा, प्राध्यापक सलाहुद्दीन आणि बाळकृष्ण चौहान यांना श्रद्धांजली वाहिली. राज्यसभेतही आज कामकाज सुरु झाल्यावर भाजप नेते जे.पी. नड्डा यांनी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी माफी मागावी,अशी मागणी केली. अशा प्रकारच्या वक्तव्यातून विरोधी पक्षाची विचारसरणी आणि मानसिकता दिसून येते असं नड्डा म्हणाले.यावरुन झालेल्या गदारोळामुळे राज्यसभेचं कामकाजही १२ वाजेपर्यंत स्थगित झालं होतं.

## सरदार पटेल पुण्यतिथी

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना देशभरातून आदरांजली वाहण्यात येत आहे. सरदार पटेल यांची ७५ वी पुण्यतिथी ही स्वावलंबी भारतासाठी प्रेरणा मिळवण्याचा एक विशेष प्रसंग आहे. त्यांनी आपल्या देशवासीयांमध्ये निर्माण केलेली राष्ट्रीय एकात्मतेची भावना विकसित भारतासाठी उर्जेचा स्रोत आहे. राष्ट्र उभारणीतील त्यांची अद्‌वितीय भूमिका मजबूत आणि शक्तिशाली भारतासाठी मार्गदर्शक ठरत राहील,असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि गृहमंत्री अमित शहा यांनीही सरदार पटेलांना आदरांजली अर्पण केली.

‘ग्लोबल ॲल्यूम्नी मीट

नागपूरच्या लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठातील माजी विद्यार्थ्यांची संघटना, लिटा यांच्या वतीने ‘ग्लोबल ॲल्यूम्नी मीट : उडान 2025-26’ चे आयोजन शनिवार, आणि रविवार, दिनांक २० आणि 21 डिसेंबर रोजी करण्यात आलं आहे. या जागतिक मेळाव्यात ,देश-विदेशातील विविध क्षेत्रांत कार्यरत एलआयटीचे माजी आणि विद्यमान विद्यार्थी सहभागी होणार आहेत. 21 डिसेंबर रोजी सायंकाळी पर्सिस्टंट हॉल, आयटी पार्क इथं होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सोलार ग्रुपचे चेअरमन सत्यनारायण नुवाल आणि बोर्ड ऑफ गव्हर्नन्सचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. गणपती यादव हेही उपस्थित राहतील.

कॅग अहवाल

राज्य सरकारमधल्या अनेक विभागांनी गेल्या आर्थिक वर्षा अखेर, सुमारे पावणे २ लाख कोटी रुपयांच्या खर्चाचे हिशोब सादर केलेले नाहीत, असं कॅगच्या अहवालात समोर आलं आहे. रविवारी विधीमंडळात हा अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर ,सुमारे पावणे ५३ हजार प्रकरणांमध्ये १ लाख ७७ हजार कोटींहून अधिक रुपयाच्या खर्चाचे हिशेब सादर झालेली नाहीत. तर ४० हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये १ लाख ३७ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेची खर्चाचे हिशोब सादर झाल्याचं कॅगनं नमूद केलं आहे. नगर विकास विभागाकडे सर्वाधिक ११ हजार कोटी, नियोजन विभागाकडे ५ हजार ८०० कोटी रुपये, जलसंपदा विभागाकडे ३ हजार ६०० कोटी रुपयांचे हिशेब प्रलंबित आहेत, असं यात नमूद आहे.

हज बुकिंग

सौदी अरेबियाच्या हज आणि उमराह मंत्रालयाने जारी केलेल्या वेळापत्रकानुसार, हज-2026 साठी निवास आणि सेवा करार अंतिम करण्याची शेवटची तारीख 1 फेब्रुवारी 2026 आहे. सौदी अरेबियामध्ये यात्रेकरूंसाठी निवास, वाहतूक आणि इतर सेवा सुनिश्चित करण्यासाठी, ही अनिवार्य करार व्यवस्था आवश्यक आहे. त्यानुसार, आवश्यक निवास आणि सेवा करारांना निर्धारित मुदतीत अंतिम रूप देण्यासाठी, शेवटच्या क्षणी होणारी गैरसोय टाळण्यासाठी आणि सर्व अनिवार्य प्रक्रिया वेळेवर पूर्ण करण्यासाठी, बुकिंगची औपचारिकता 15 जानेवारी 2026 रोजी किंवा त्यापूर्वी पूर्ण करावी. बुकिंग करण्यापूर्वी संबंधित एच.जी.ओ./पी.टी.ओ..ची नोंदणी स्थिती, कोटा आणि मंजुरीची पडताळणी करावी आणि

केवळ अधिकृत एच.जी.ओ.मार्फतच बुकिंग करावे, अशा सूचना शासनाद्वारे जारी करण्यात आल्या आहेत.

आरोग्य रँकिंग

महाराष्ट्र राज्यात गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम आणि डोंगराळ जंगलव्याप्त गावे असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. येथील नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ वेळेवर मिळावा, यासाठी आरोग्य विभाग सतत प्रयत्नशील असतो. नुकतेच आरोग्य कार्यक्रमांचे अंमलबजावणी नोव्हेंबर २०२५ चे रँकिंग संचालक आरोग्य सेवा, आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशकांवर आधारित या राज्यस्तरीय रँकिंगमध्ये, गडचिरोली जिल्हयाने ८७ गुणांसह राज्यात तिसरा क्रमांक पटकावून आपली उत्कृष्ट कामगिरी सिद्ध केली आहे. विशेष म्हणजे, जिल्हा आरोग्य विभाग मागील सहा महिन्यांपासून सातत्याने राज्यात पहिल्या पाच जिल्हयांमध्ये आपल स्थान टिकवून आहे.

आयुष्यमान भारत

दरम्यान, आयुष्यमान भारत गोल्डन कार्डच्या नोंदणीत गडचिरोली जिल्हयाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. याबाबत आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी आज जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि अन्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सन्मानित केल. नागपुरातील एम्सच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीदरम्यान हा सत्कार करण्यात आला.

स्क्वॅश

पहिला स्क्वॅश विश्वचषक जिंकल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. यामुळे भारताचं जागतिक क्रीडा स्पर्धांमधलं वर्चस्व दिसून येतं तसंच या खेळाची लोकप्रियता वाढून खेळाडूंना प्रेरणा मिळेल,असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

अण्णा दादू बनसोडे

महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती अण्णा दादू बनसोडे यांनी नुकतीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी संविधान प्रास्ताविका पार्कची पाहणी करून हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये

संवैधानिक मूल्ये रुजविण्यास प्रेरणादायी असल्याच सांगत कौतुक केल. तसेच कायदेशीर शिक्षणाचे राष्ट्रीय विकासातील महत्त्व अधोरेखित करत शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

हवामान

विदर्भात गोंदिया इथं आज 9.2 अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी, किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. यवतमाळ इथं 9.8, भंडारा इथं 10 अंश सेल्सिअस, वाशीम आणि नागपूर इथं 10.4 इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. उर्वरित सर्व जिल्हयांमध्ये तापमान 11 ते 14 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

उस्ताद झाकीर हुसेन यांच्या स्मृतिदिनी

जागतिक कीर्तीचे तबला वादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या प्रथम स्मृतिदिनी, त्यांना 'जागतिक अभिवादन' करण्यासाठी' राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातीचे 50 हून अधिक कलावंत, विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंब 'माइस्ट्रो फॉरएव्हर' या दोन दिवसीय कार्यक्रमात एकत्र आले आहेत. एनसीपीए तर्फे कालपासून या दोन दिवसीय कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

*****